# महामेट्रो रेल्वेचा हरित प्रकल्प

पुणे महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड महानगर पालिका हद्दीमध्ये महाराष्ट्र महामेट्रो रेल्वे प्रकल्पाचे काम सुरु आहे . प्रस्तुत प्रकल्पा अंतर्गत मार्गिकांचे नियोजन करताना जास्तीत जास्त वृक्ष वाचवूनच मार्गिका निश्चित केल्या आहेत . याउपर मार्गिकाचें मध्ये खांब उभारणीचे फौंडेशन मध्ये जे वृक्ष बाधित होत आहे . अशा वृक्षांचे प्राधान्याने पुनर्रोपणाचे काम ही सध्या चालू आहे . आज अखेर १६७ वृक्षांच्या पुनर्रोपणाचे काम अनुक्रमे पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमधील गुलाब पुष्पवाटिका , पिंपरी , सांडपाणी प्रक्रिया संयंत्र, कासारवाडी तसेच संत तुकाराम नगर एस . टी . स्टॅन्ड येथे यशस्वीरीत्या करण्यात आले आहे . तसेच मुठा नदीपात्रा मधील मार्गिकेमध्ये येणारे वृक्षाचे नदीपात्राच्या कडेस पुनर्रोपण केले आहे .

महामेट्रो रेलचा हरित प्रकल्प केवळ नावासाठी आहे असे नसून ज्या वृक्षांचे पुनर्रोपण करण्याचे नियोजन असले तरी पर्यायी एकास १० वृक्ष लावून त्यांचे संवर्धन करण्याचे काम या प्रकल्पाअंतर्गत करीत आहोत . २०१६-१७ च्या पावसाळ्या मध्ये अनुक्रमे खालील प्रमाणे वृक्ष लागवड करून त्याचे संवर्धनाचे काम चालू आहे .

१) तळजाई पाचगाव पर्वती वनविभाग - ३०००

२) आकुर्डी नियोजन उद्यान - १२५

३) संत तुकाराम नगर - ४०

---------------------------------------------------

३१६५

यावर्षीच्या पावसाळी हंगामामध्ये महामेट्रो रेल्वे प्रकल्पा अंतर्गत खालील ठिकाणी वृक्ष लागवड व संवर्धनाची योजना राबवीत आहोत .

१) टी . बी . २ दिघी कॅम्प आळंदी रोड - १५००

२) ग्रेप सेंटर आळंदी रोड - १५००

३) आय टी आय औंध - १०००

४) तळजाई , वनविभाग - १०००

---------------------------------------

६०००

उपरोक्त नमूद केल्या प्रमाणे वृक्षांचे पुनर्रोपण तसेच वृक्ष लागवड व संवर्धनाचे उपक्रमामुळेदोन्ही शहराचे हरित सौंदर्यामध्ये वाढ होऊन एकप्रकारे पर्यावरणास हातभार लागणार आहे .

महामेट्रो रेल्वे विभागाने पीसीएमसी ते हॅरिस पूल दरम्यान १०६ वृक्षांचे पुनर्रोपणस वृक्ष प्राधिकरणाने मान्यता दिलेले आहे . त्यापैकी आज अखेर ३९ वृक्षांचे पुनर्रोपण केले आहे . सदरहू वृक्ष सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प , कासारवाडी येथे लावण्यात आली आहेत. यामध्ये प्रामुख्याने १०-१५ वर्षांचे वृक्ष असून त्यामध्ये पेल्टाफोरम व महोगनी या वृक्षांच्या प्रजातीचा समावेश आहे .